CNR NO. MHSO070004082022

नि. दि. दा. क्र. ३१४/२०२२
(सुब्राव पाटील वि. श्रीराम शिंगटे व इतर)

## निशाणी क्र. १७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होऊन सदर प्रतिवादी विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून म्हणणे व कैफियत स्विकारण्यात यावी यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादीने निशाणी क्र.१८ कडे प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०२) प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांना कायद्याची अपुरी माहिती व ज्ञान असल्याने दाव्यासंबंधीचे कागदपत्रे महसुल विभागातून मिळण्यास विलंब झाला आहे तसेच शेतीतील कामाचे व्यापामुळे व स्वतःच्या आजारपणामुळे प्रतिवादी क्र. २ यांना वकिलांशी संपर्क न झाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. तसेच सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने प्रतिवादी नं. २ विरुध्द करण्यात आलेला No W.S. आदेश रद्द करण्यात येवून या प्रतिवादींची कैफियत स्विकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३) वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज खरा व कायदेशिर नसल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीने अर्जात दिलेले कारण मोघम स्वरुपाचे आहे ते स्विकाहार्य नसून प्रतिवादीने जाणूनबजून कैफियत दाखल करण्यास विलंब केला आहे असून विलंबाबाबत कोणतेही स्प्ष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा असे कथन केले आहे. तसेच जर अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादीस २,०००/– कॉस्ट करुन ती वादीस देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०४) प्रतिवादीतर्फे वकील श्री. पाटील व वादीतर्फे वकील श्री. बनसोडे–माळी यांचा युक्तीवाद ऐकला.

०५)  दावा, अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने निरंतरची ताकिदीसाठी दाखल केला आहे. सबब, दाव्याचा गुणावगुणावर निकाल होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. या प्रतिवादीला त्यांचा बचाव दाव्याच्या गुणदोषावर निकाल होण्यासाठी दाखल करण्याची परवानगी देणे उचित आहे. अर्ज मंजूर केलेस वादीचे नुकसान होणार नाही. मात्र नामंजूर केलेस या प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब या प्रतिवादीने वादीला रक्कम रुपये २००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

०३. प्रस्तुत प्रतिवादीने कॉस्टची रक्कम भरल्यानंतर त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.

०४. प्रस्तुत प्रतिवादीने कॉस्टची रक्कम भरल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

०५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2023.03.06 04:38:08 +0530

( एम. आर. कामत )

दिनांकः- ०१/०३/२०२३.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Shaikh. |
| Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Date | : | 01/03/2023. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 01/03/2023. |
| Judgment/Order uploaded on | : | 06/03/2023. |